**चित्रपट निर्मिती, टि.व्ही मालिका, जाहिरातपट व माहितीपट इत्यादींच्या चित्रिकरणाच्या परवानगीसाठी एक खिडकी योजना (Single Window Clearance System) लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : गोचिन २०१६/प्र.क्र. १८९ /सां.का.१**
मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २२ मे, २०१८

**प्रस्तावना :**

व्यवसाय करण्यासाठी सुलभता (Ease of doing business) या विषयाबाबतचे शासनाचे धोरण लक्षात घेऊन यासंदर्भात दि.१८.०९.२०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार चित्रपट, टि.व्ही. मालिका, जाहिरातपट व माहितीपट इत्यादींच्या चित्रिकरणासाठी लागणाऱ्या विविध विभागांच्या परवानग्या सुलभरीतीने व ठराविक मुदतीमध्ये मिळाव्यात याद्दष्टीने एक खिडकी योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

विचारांती या शासन निर्णयान्वये चित्रपट, टि.व्ही मालिका, जाहिरातपट व माहितीपट इत्यादींच्या चित्रिकरणाच्या परवानगीसाठी खालीलप्रमाणे एक खिडकी योजना कार्यान्वित करण्यात येत आहे.

१) या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई ही संनियंत्रण संस्था (Nodal Agency) म्हणून काम पाहील.

२) चित्रिकरणाचे स्थळ हे शासकीय जागेवरती असेल तरच या योजनेव्दारे चित्रिकरणासाठी परवानगी देण्यात येईल. खाजगी स्थळांच्या चित्रिकरणासाठी ही योजना लागू नाही.

३) चित्रिकरणाकरिता आवश्यक परवानग्या मिळण्यासाठी संबंधित निर्मात्यांनी www.maharashtrafilmcell.com या वेब पोर्टलवरती Online प्रणालीव्दारे अर्ज करणे आवश्यक आहे.

४) निर्मात्याने ऑनलाईन प्रणालीव्दारे त्यांना ज्या स्थळावर ज्या कालावधीसाठी चित्रिकरण करावयाचे आहे ते चित्रिकरण स्थळ त्या कालावधीसाठी उपलब्ध आहे किंवा नाही हे तपासून, ते उपलब्ध असल्यास संबंधित स्थळाच्या चित्रिकरणाच्या अटी व शर्ती मान्य करुन त्यासाठी आवश्यक असणारे शुल्क ई-पेमेंट व्दारे [संबंधित शासकीय यंत्रणांनी (Stake Holder) त्यांचे चित्रिकरणाच्या स्थळासाठी निश्चित केलेले शुल्क व आवश्यक त्या ठिकाणी निश्चित केलेली अनामत रक्कम] जमा केल्यानंतर निर्मात्यांना Order ID व Order Date प्राप्त होईल व त्यानंतर चित्रिकरणासाठीची परवानगीची प्रक्रिया सुरु होईल.

५) निर्मात्यास आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर Order ID व Order Date प्राप्त झाल्यानंतरच त्यांचा परवानगीबाबतचा अर्ज चित्रिकरण स्थळाशी संबंधित शासकीय यंत्रणा (Stakeholders) तसेच संनियंत्रण संस्था म्हणून काम पहाणाऱ्या चित्रनगरी महामंडळास वेब पोर्टलवरील डॅशबोर्डवर प्राप्त होईल.

६) निर्मात्याचा अर्ज प्राप्त झाल्यापासून (म्हणजेच निर्मात्यास Order ID व Order Date प्राप्त झाल्यापासून) ७ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत चित्रिकरणाची परवानगी मान्य करणे अथवा नाकारणे शासकीय यंत्रणेवर (Stakeholders)बंधनकारक असेल.

७) निर्मात्याचा अर्ज प्राप्त झालेल्या दिनांकापासून १५ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांमध्ये (Fifteen Working Days), चित्रिकरण स्थळाशी संबंधित शासकीय यंत्रणा (Stakeholder) यांच्यासोबत पाठपुरावा करुन चित्रनगरी महामंडळामार्फत (संनियंत्रण संस्था) चित्रिकरणासाठी परवानगी देण्यात येईल.

८) चित्रिकरणासाठी निर्मात्यास परवानगी दिल्यानंतर संनियंत्रण संस्थेने चित्रिकरण स्थळांशी संबंधित शासकीय यंत्रणांना (Stakeholders) त्यांच्या शुल्काची रक्कम १५ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांमध्ये (Fifteen Working Days) ई-पेमेंटव्दारे अदा करण्यात येईल.

९) चित्रिकरण स्थळाशी संबंधित शासकीय यंत्रणा (Stakeholder) यांनी परवानगी नाकारल्यास, त्याबाबतचे कारण चित्रनगरी महामंडळामार्फत (संनियंत्रण संस्था) निर्मात्यास अर्ज प्राप्त झालेल्या दिनांकापासून १५ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांमध्ये (Fifteen Working Days) कळविण्यात येईल. निर्मात्याने ई-पेमेंटव्दारे जमा केलेली रक्कम प्रक्रिया शुल्क (Processing Fee) वगळून ई-पेमेंटव्दारे पुढील १५ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांमध्ये (Fifteen Working Days) परत केली जाईल.

१०) तथापि ७ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत संनियंत्रण संस्थेने पाठपुरावा करुनही शासकीय यंत्रणा (Stakeholder) कडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यास सदर चित्रिकरणास त्यांची हरकत नाही असे गृहीत धरुन चित्रिकरणास संनियंत्रण संस्थेमार्फत परवानगी देण्यात येईल.विशिष्ट अटी व शर्तींच्या अधीन ज्या शासकीय यंत्रणांची परवानगी घेणे आवश्यक आहे अशा शासकीय यंत्रणांची यादी सोबतच्या परिशिष्ट "अ"मध्ये नमूद केली आहे.

११) सद्यस्थितीत इतर शासकीय यंत्रणा (Stakeholder) यांनी परवानगी / ना-हरकत दिल्याशिवाय काही शासकीय यंत्रणा परवानगी / ना-हरकत देत नाहीत. तथापि, एक खिडकी योजनेमध्ये परवानगी / ना-हरकत देण्यासाठी एका शासकीय यंत्रणेला दुसऱ्या शासकीय यंत्रणेवर अवलंबून राहण्याची आवश्यकता नाही. कारण सर्व शासकीय यंत्रणांची परवानगी / ना-हरकत विचारात घेऊन चित्रिकरणासाठी अंतिम परवानगी देण्याची कार्यवाही संनियंत्रण संस्थेमार्फत करण्यात येईल. त्यामुळे प्रत्येक शासकीय यंत्रणेने इतर शासकीय यंत्रणांच्या परवानगी / ना-हरकतीवर अवलंबून न राहता आपली परवानगी / ना-हरकत स्वतंत्रपणे तात्काळ संनियंत्रण संस्थेस अवगत करणे आवश्यक राहील.

१२) चित्रिकरणाच्या एकाच स्थळासाठी जर विविध शासकीय यंत्रणांकडून ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक असेल अशावेळी सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी असे प्रमाणपत्र दिले तरच

विहित मुदतीत संनियंत्रण संस्थेमार्फत परवानगी देण्यात येईल. मात्र त्यापैकी एका शासकीय यंत्रणेने जरी ना-हरकत प्रमाणपत्र नाकारले तर संबंधित स्थळावर चित्रिकरणासाठी परवानगी नाकारल्याचे विहित मुदतीत निर्मात्यास कळविण्यात येईल.

**१३)** चित्रिकरणासाठी एकदा परवानगी दिल्यानंतर निर्मात्यास चित्रिकरणाचे आरक्षण रद्द करता येणार नाही व त्यासाठीचे चित्रिकरण शुल्क परत केले जाणार नाही. चित्रिकरणासाठी अर्ज सादर केल्यापासून चित्रिकरणास परवानगी प्राप्त होण्याच्या कालावधीत जर निर्मात्याने अर्ज रद्द करण्याची विनंती केली तर प्रक्रिया शुल्क (Processing Fee) वगळून उर्वरीत चित्रिकरण शुल्क निर्मात्यास परत करण्यात येईल.

**१४)** निर्मात्यास चित्रिकरणासाठी परवानगी दिल्यानंतर काही नैसर्गिक आपत्तीमुळे चित्रिकरण होऊ शकले नाही तर निर्मात्यास चित्रिकरण शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही.

**१५)** ज्या चित्रिकरण स्थळासाठी अनामत रक्कम निर्मात्याने ई-पेमेंटव्दारे भरली आहे अशा प्रकरणी संबंधित निर्मात्यास चित्रिकरणानंतर अनामत रक्कम परत करणे आवश्यक असल्याने सदर अनामत रक्कम चित्रनगरी महामंडळाकडेच राहील. चित्रिकरण पूर्ण होऊन संबंधित यंत्रणेकडून अनामत रक्कम परत करण्याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर चित्रनगरी महामंडळ सदर अनामत रक्कम १५ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत (Fifteen Working Days) निर्मात्यास परत दिली जाईल.

**१६)** सदर योजनेची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संनियंत्रण संस्था म्हणून चित्रनगरी महामंडळाची राहील. मात्र गोरेगाव चित्रनगरी महामंडळ ही संनियंत्रण संस्था फक्त निर्माता व शासकीय यंत्रणा (Stakeholder) यांच्यामध्ये समन्वय साधण्याचे काम करणार आहे. निर्मात्यास चित्रिकरणासाठी परवानगी देण्याची पूर्ण जबाबदारी संबंधित शासकीय यंत्रणेची असेल. यासाठी शासकीय यंत्रणा यांनी त्यांच्या अखत्यारीतील चित्रिकरण स्थळावर चित्रिकरण करण्यासाठी परवानगी देण्याकरीताच्या अटी व शर्ती काळजीपूर्वक निश्चित कराव्यात जेणेकरुन त्या अटी व शर्तीनुसार निर्मात्यास चित्रिकरणाची परवानगी दिली जाईल.

**१७)** चित्रिकरण स्थळाशी संबंधित सर्व शासकीय कार्यालयांनी या योजनेसाठी एक संनियंत्रण अधिकारी नेमणे आवश्यक आहे. निर्मात्यांचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ७ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत परवानगी देणे अथवा नाकारणे याबाबतची जबाबदारी संबंधित संनियंत्रण अधिकारी यांची राहील.

**१८)** चित्रिकरणास परवानगीबाबतच्या एक खिडकी योजनेच्या उपरोक्त नमूद वेब पोर्टलवर चित्रिकरण स्थळांची तसेच त्या स्थळांच्या संबंधित शासकीय यंत्रणा (Stakeholder) यांची यादी उपलब्ध आहे.

**१९)** मात्र सदर यादी व्यतिरिक्त नवीन स्थळांची चित्रिकरणासाठी निर्मात्यांकडून मागणी प्राप्त झाल्यास सदर मागणीनुसार नवीन स्थळ ज्या शासकीय यंत्रणेच्या अधिपत्याखाली आहे त्या यंत्रणेची सहमती घेऊन त्या स्थळाचा वेब पोर्टलवरील चित्रिकरण स्थळांच्या यादीत कायमस्वरुपी समावेश करण्यात येईल. अशा प्रकारे वेळोवेळी चित्रिकरण स्थळांची व त्यानुसार संबंधित Stakeholder यांची यादी अद्ययावत करण्याची जबाबदारी संनियंत्रण

संस्थेची राहील. तसेच यादीत नव्याने समाविष्ट होणाऱ्या शासकीय यंत्रणा (Stakeholder) यांना या शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

२०) सदर योजना सद्य:स्थितीत प्रायोगिक तत्वावर प्रथम टप्प्यात मुंबई शहर व मुंबई उपनगराकरीता लागू करण्यात येत आहे. तद्नंतर टप्प्याटप्याने सदर योजना उर्वरीत महाराष्ट्राकरीता लागू करण्यात येईल.

२. सदर एक खिडकी योजनेकरिता आवश्यकता भासल्यास आर्थिक तरतूद करण्याची कार्यवाही चित्रनगरी महामंडळाने त्यांच्या स्वनिधीतून करावी.

३. सदर योजना ही प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येत असल्याने यामध्ये काही सुयोग्य दुरुस्त्या, बदल, सुधारणा करावयाच्या असल्यास अश्या दुरुस्त्या, बदल, सुधारणा सांस्कृतिक कार्य विभागाकडुन वेळोवेळी केल्या जातील. त्याचप्रमाणे मंत्रालयीन संबंधित विभागांकडून विहीत केलेल्या अटी व शर्तींचे पालन करणे निर्मात्यास बंधनकारक राहील. सदर योजना सेवा हमी कायदयांतर्गत आणण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०५२२१४३१४५३२२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prasad Mahadeo Mahajan

Digitally signed by Prasad Mahadeo Mahajan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6fcffe7574d536c6e270856345547bb470a3e70655baa82e214fc4d0cfaccaed, serialNumber=b8ea3f1827aabafa30caec97c98f4c9643851c3a32cfa11a13f635fc0bea0ac3, cn=Prasad Mahadeo Mahajan
Date: 2018.05.25 12:02:59 +05'30'

**( प्र.म.महाजन )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी,मंत्रालय,मुंबई
४. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय ,मुंबई
५. मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.
६. सर्व सन्माननीय विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
७. महालेखापाल (लेखा व परीक्षा ) एक, महाराष्ट्र, मुंबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) एक, महाराष्ट्र, मुंबई
९. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव यांचे स्वीय सहायक, सर्व मंत्रालयीन विभाग,मुंबई
१०. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र
११. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पू), मुंबई
१२. चित्रिकरण स्थळांशी संबधित सर्व शासकीय यंत्रणा - दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पू), मुंबई यांच्या मार्फत.
१३. निवड नस्ती, सां.का.१.

**परिशिष्ट – “अ”**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय क्र.गोचिन-२०१६ / प्र.क्र.१८९ / सां.का.१
दिनांक : २२ मे, २०१८ चे सहपत्र

**विशिष्ट अटी व शर्तीच्या अधीन चित्रिकरणासाठी परवानगी देण्यात येणार असलेल्या चित्रिकरणस्थळांची यादी**

| अ. क्र. | संबंधित प्रशासकीय विभागाचे नाव | संबंधित चित्रिकरण स्थळाचे नाव | विवक्षित अटी व शर्ती |
|---|---|---|---|
| १ | नगर विकास विभाग | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या संस्थांनी www.maharashtrafilmcell.com या संकेतस्थळावर त्यांच्याकडील चित्रिकरणासाठी उपलब्ध स्थळे घोषित केली असतील त्यास ही एक खिडकी योजनेंतर्गतची व्यवस्था लागू करणे शक्य होईल. तथापि जी स्थळे www.maharashtrafilmcell.com (महाराष्ट्र फिल्मसेल) या संकेतस्थळावर उपलब्ध असणार नाहीत वा कायद्यान्वये चित्रिकरणास मर्यादित/प्रतिबंधित केली आहेत, अशा स्थळांसाठी त्या संबंधित संस्थेची चित्रिकरणासाठी स्वतंत्र परवानगी घ्यावी लागेल. |
| २ | वन विभाग | नॅशनल पार्क (SGNP) | नॅशनल पार्क (SGNP) येथे चित्रिकरण करण्याची परवानगी WL (P)Act,१९७२ अंतर्गत देण्यात येते आणि ही अर्धन्यायिक शक्ती आहे. सबब सात दिवसांच्या मर्यादेतून नॅशनल पार्क वगळण्यात येत आहे. |
| ३ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | सर ज.जी.कला महाविद्यालय,मुंबई व सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय,मुंबई | कला संचालनालयाच्या अधिपत्याखाली सर ज.जी.कला महाविद्यालय,मुंबई व सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय,मुंबई ही शासकीय महाविद्यालये असून, त्या महाविद्यालयाच्या परिसरातील चित्रिकरणाचे दर, अटी व शर्ती दि.१९.०७.२०११ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले आहेत व सदर शासन निर्णयान्वये सर ज.जी.कला शाहा परिसर चित्रिकरणास परवानगी देण्याचे अधिकार कला संचालक,कला संचालनालय,मुंबई यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने एक खिडकी योजनेसंदर्भातील दि.१९.०७.२०११ च्या शासन निर्णयातील दर, अटी व शर्तीच्या अधीन राहील. |
| ४ | पर्यावरण विभाग | सर्व चित्रिकरण स्थळे | चित्रिकरण करण्यापूर्वी संबंधित स्थळाचा पर्यावरणीय आघात मुल्यांकन अहवाल संक्षिप्तपणे तयार करण्यात यावा. सदर अहवालात पर्यावरणविषयक अधिसूचना व अधिनियम (उदा.पर्यावरण (संरक्षण)कायदा,१९८६, हवा (प्र.व नि.)कायदा १९८१,जल (प्र. व नि.)) कायदा १९७४,ध्वनिप्रदूषण नियम २०००, |

| अ. क्र. | संबंधित प्रशासकीय विभागाचे नाव | संबंधित चित्रिकरण स्थळाचे नाव | विवक्षित अटी व शर्ती |
|---|---|---|---|
| | | | नागरी घनकचरा नियम २०१६,घातक घनकचरा नियम २०१६,कचरा व्यवस्थापन नियम २०१६) इत्यादींमधील तरतुदींच्या अनुपालनाबाबत शपथपत्र जोडण्यात यावे. सदर अहवाल व शपथपत्र यांच्या प्रती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालयास,संबंधित कार्यालयास व पर्यावरण विभागास देण्यात याव्या. |
| ५ | कौशल्य विकास व उदयोजकता विभाग | एलफिस्टन तांत्रिक विद्यालय | सदर ठिकाणी चित्रिकरण करण्यासाठी बाजारभावाप्रमाणे दर आकारले जातील तसेच चित्रिकरणस्थळाचे नुकसान होण्याची शक्यता विचारात घेऊन अनामत रक्कम घेण्यात येईल. |
| ६ | पर्यटन विभाग | सर्व चित्रिकरण स्थळे | चित्रिकरणासाठी आवश्यक ती सुयोग्य स्थळे त्या त्या ठिकाणच्या निर्धारीत दराप्रमाणे चित्रिकरणासाठी देण्यात येतील. |
| ७ | सामान्य प्रशासन विभाग | सर्व चित्रिकरण स्थळे | चित्रिकरणासाठी आवश्यक ती सुयोग्य स्थळे त्या त्या ठिकाणच्या निर्धारीत दराप्रमाणे चित्रिकरणासाठी देण्यात येतील. |
| ८ | सार्वजनिक बांधकाम विभाग | सर्व चित्रिकरण स्थळे | चित्रिकरणासाठी आवश्यक ती सुयोग्य स्थळे त्या त्या ठिकाणच्या निर्धारीत दराप्रमाणे चित्रिकरणासाठी देण्यात येतील. |
| ९ | गृह विभाग | सर्व चित्रिकरण स्थळे | चित्रिकरणासाठी आवश्यक ती सुयोग्य स्थळे त्या त्या ठिकाणच्या निर्धारीत दराप्रमाणे चित्रिकरणासाठी देण्यात येतील. |
| १० | महसूल विभाग | सर्व चित्रिकरण स्थळे | महसूल व वन विभाग (महसूल) च्या अखत्यारितील शासकीय जागेवरील ज्या स्थळांची महसूल विभागाच्या सहमतीने चित्रिकरणारकरीता पुर्वनिश्चिती करण्यात आलेली नाही, अशा स्थळांवरील चित्रिकरणासाठी महसूल व वन विभाग (महसूल) च्या अखत्यारितील संबंधित यंत्रणेकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील. |
| ११ | सार्वजनिक आरोग्य विभाग | सर्व चित्रिकरण स्थळे | सदर चित्रिकरणामुळे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या चल, अचल संपत्तीची कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही, या अटीच्या अधिन राहून सहमती देण्यात येत आहे. हानी झाल्यास सदरची नुकसानभरपाई व दंड निर्मात्यास देणे बंधनकारक राहील. |
| १२ | कृषी विभाग | सर्व चित्रिकरण स्थळे | चित्रिकरणासाठी आवश्यक ती सुयोग्य स्थळे त्या त्या ठिकाणच्या निर्धारीत दराप्रमाणे चित्रिकरणासाठी देण्यात येतील. |
| १३ | उद्योग व ऊर्जा विभाग | सर्व चित्रिकरण स्थळे | उद्योगांना सर्व मंजुऱ्या एकाच ठिकाणी देण्यासाठी एक खिडकी योजना राबविण्याकरीता "मैत्री कक्ष" सक्षम करणे या विषयीचा शासन निर्णय क्र.मेइम २०१५/प्र.क्र.१०५/उद्योग-८, दि.११.०२.२०१६ अनुसार कार्यवाही करण्यात यावी. |

* * * * *